पर्यायी वाद निराकरणाअंतर्गत मध्यस्थी करणाऱ्या मध्यस्थांना (Mediator) देण्यात येणाऱ्या मानधनामध्ये वाढ करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## विधि व न्याय विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०२२/३५५/प्र.क्र.३०७/कार्यासन-२२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई ४०००३२.
दिनांक : १० जानेवारी, २०२४.

संदर्भ :-
संचालक/समन्वयक, मुख्य मध्यस्थी केंद्र, उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र.७६९ /Mediation/२०२२, दिनांक ०५.०७.२०२२, पत्र क्र.मध्यस्थी/२०२३/२४४, दि.२५.०१.२०२३ व पत्र क्र. मध्यस्थी/२०२३/३१३६, दि.१६.१०.२०२३.

**<u>प्रस्तावना</u> :-**

मध्यस्थांमार्फत वादाचे निराकरण हा पर्यायी वाद निराकरणाचा एक प्रकार आहे. चौदाव्या वित्त आयोगाने पर्याय वाद निराकरणास प्रोत्साहन म्हणून मध्यस्थांना प्रत्येक यशस्वी मध्यस्थी प्रकरणाकरिता कमाल रुपये २,५००/- च्या मर्यादेमध्ये परंतु जिल्हा निहाय ५० यशस्वी मध्यस्थी प्रकरणांकरिता निधीची तरतूद केली होती. दि.३१ मार्च, २०२० पासून, १४ व्या वित्त आयोगांतर्गत शासनास मिळणारे उक्त अनुदान संपुष्टात आले आहे.

Mediation and Conciliation Project Committee, Supreme Court, New Delhi या समितीच्या दिनांक १५.१२.२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये, संपूर्ण देशातील मध्यस्थांच्या मानधनात वाढ करणेबाबत शिफारस केली आहे. त्यामध्ये (१) मध्यस्थांमार्फत यशस्वीरीत्या प्रकरणाचे निराकरण झाल्यानंतर रू.५०००/- प्रतिप्रकरणाकरिता मानधन देणेबाबत, (२) प्रकरणाशी संबंधीत असलेल्या सर्व प्रकरणांकरिता (Connected cases) रू.१०००/- प्रतिप्रकरण परंतु संबंधित प्रकरणांची संख्या कितीही असली तरी कमाल रू.३०००/- या मर्यादेमध्ये मानधन देणेबाबत तसेच (३) तीन प्रभावी सुनावण्यांमध्ये वादी आणि प्रतिवादी यांचेमध्ये समेट घडून न आल्यास रू.२,५००/- याप्रमाणे मानधन देण्याबाबत शिफारस केली आहे. त्यानुसार Mediation and Conciliation Project Committee, Supreme Court, New Delhi यांच्या उक्त शिफारशींच्या अनुषंगाने संचालक/समन्वयक, मुख्य मध्यस्थी केंद्र, उच्च न्यायालय, मुंबई यांनी शासनास प्रस्ताव सादर केला आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती तसेच मध्यस्थांमार्फत वादाचे निराकरण या पर्यायी वाद निराकरणाच्या प्रकारास प्रोत्साहन देण्याची बाब विचारात घेता, मध्यस्थांना (Mediator) देण्यात येणाऱ्या मानधनामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

मध्यस्थांमार्फत वादाचे निराकरण या पर्यायी वाद निराकरणाच्या प्रकारास प्रोत्साहन देण्याकरिता मध्यस्थांना (Mediator) देण्यात येणाऱ्या मानधनामध्ये वाढ करून, खालीलप्रमाणे मानधन निश्चित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | मध्यस्थी प्रकरणाचा प्रकार (Nature of Case) | मानधन (रूपये) |
| --- | --- | --- |
| १ | यशस्वी मध्यस्थी (On settlement through Mediation) | ५०००/- |
| २ | जोडलेली प्रकरणे (Connected cases) | १०००/- प्रति प्रकरण, परंतु संबंधित प्रकरणांची संख्या कितीही असली तरी कमाल रू.३०००/- या मर्यादेमध्ये |
| ३ | अयशस्वी मध्यस्थी (मध्यस्थीच्या तीन प्रभावी सुनावण्यानंतरही पक्षकार सौहार्दपूर्ण तोडगा काढण्यात अयशस्वी झाल्यास) | २५००/- |

याप्रीत्यर्थ होणारा खर्च लेखाशीर्ष- मागणी क्रमांक जे-१, २०१४ न्यायदान, ११४ विधि सल्लागार व समुपदेशी, (००) (०३) महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण (अनिवार्य) (२०१४ ०३१४)- २८ विशेष व्यावसायिक सेवा या उद्दिष्टाखालील त्या-त्या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.९७२/व्यय-५, दिनांक २२.१२.२०२३ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार नावाने,

विवेग्र/गायकवाड
१०/०१/२०२४
(विलास वसंत गायकवाड)
विधि सल्लागार-नि-सह सचिव

प्रति,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), एक/ दोन, मुंबई/ नागपूर, महाराष्ट्र.
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
४) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई.

५) संचालक/समन्वयक, मुख्य मध्यस्थी केंद्र, उच्च न्यायालय, मुंबई.

६) सचिव, उच्च न्यायालय विधि सेवा समिती, मुंबई व उपसमिती-औरंगाबादए नागपूर.

७) सचिव, सर्व जिल्हा विधि सेवा प्राधिकरण.

८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

९) वित्त विभाग, (व्यय-५ कार्यासन), मंत्रालय , मुंबई.

१०) विधि व न्याय विभाग, (कार्यासन क्र.२३, २४ व २५) मंत्रालय, मुंबई.

११) निवडनस्ती.

**********